सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
**Formerly Pune University**

| | |
|---|---|
| अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष | **Internal Quality Assurance Cell** |
| गणेशखिंड, पुणे–४११००७ | **Ganeshkhind, Pune – 411007** |
| दूरध्वनी क्रमांक: ०२०–२५६२१०४८/४९/५१ | **Contact No. : 020-25621048/49/51** |
| ई–मेल : **iqac@unipune.ac.in** | **E-mail - iqac@unipune.ac.in** |
| संकेतस्थळ - **www.unipune.ac.in** | **Website – www.unipune.ac.in** |


अंगुहक/७३७/२०२६ दिनांक : २१/१०/२०२६

## अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,**
सर्व संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व विद्यापीठ विभाग,
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि दादरा नगर हवेली)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७.

**विषय : पदव्युत्तर पदवी परीक्षेतील प्रथम/द्वितीय क्रमांक प्राप्त गुणवंत दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी 'कृष्णा कुमारी वर्मा मेमोरियल अवॉर्ड २०२६ देण्यात येणाऱ्या पुरस्कारासंदर्भात……**

**संदर्भ : ऑल इंडिया कॉन्फेडरेशन ऑफ द ब्लाइंड (AICB), नवी दिल्ली यांचे जावक पत्र क्र. AICB/K-1/2026, दि. २३/०९/२०२६ अन्वये.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, दिल्ली विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाचे निवृत्त प्राध्यापक आणि माजी प्रमुख स्व. डॉ. वेद प्रकाश वर्मा यांच्या आर्थिक साहाय्याने, विद्यापीठाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात संबंधित विषयात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या उत्कृष्ट दृष्टीहीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी **ऑल इंडिया कॉन्फेडरेशन ऑफ द ब्लाइंड (AICB), नवी दिल्ली** यांनी **"कृष्णा कुमारी वर्मा मेमोरियल अवॉर्ड"** ची स्थापना केली आहे. या पुरस्काराचा मुख्य उद्देश दृष्टीहीन विद्यार्थ्यांना त्यांच्या पदव्युत्तर परीक्षांमध्ये सर्वोच्च स्थान मिळवण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे.

**विद्यापीठाच्या गुणवत्ता क्रमवारीत प्रथम/द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यास हा पुरस्कार देण्यात येईल.**

**पुरस्काराचे स्वरूप:**

- **रक्कम:** रु.४०,०००/- (रु. चाळीस हजार मात्र), सन्मानपत्र, प्रशस्तीपत्र आणि स्मृतीचिन्ह.
- **टीप:** संगीत आणि ललित कला (Music & Fine Arts) व्यतिरिक्त इतर सर्व पदव्युत्तर विषयांसाठी हा पुरस्कार लागू आहे.
- निवड झालेल्या विद्यार्थ्याला (आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या एका सहकाऱ्यास) ४ जानेवारी २०२७ रोजी होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यासाठी रेल्वे प्रवास खर्च (AC 2-Tier) व निवास व्यवस्था AICB द्वारे पुरवली जाईल.

**आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे :-**

1. विद्यार्थ्याने दिलेल्या सर्व परीक्षांच्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती, संबंधित विभागप्रमुखांनी प्रमाणित केलेल्या.
2. विद्यापीठातील गुणवत्ता क्रमवारीतील विद्यार्थ्याचे स्थान दर्शविणारे प्रमाणपत्र. सदर प्रमाणपत्रावर खालीलपैकी कोणत्याही **दोन अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या** असणे आवश्यक आहे :-

- विभागप्रमुख, किंवा
- कुलसचिव, किंवा
- परीक्षा नियंत्रक/अधिष्ठाता.

3. **UDID द्वारे अथवा मान्यताप्राप्त शासकीय रुग्णालयामार्फत जारी केलेले वैध दिव्यांगत्व प्रमाणपत्र.**
4. पासपोर्ट आकाराचा छायाचित्र.

सदर पुरस्कारासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यास त्याच्या **एका सहकाऱ्यासह (Assistant)** पुरस्कार समारंभासाठी ये-जा करण्याकरिता नियमानुसार **AC 2-Tier रेल्वे प्रवासाचे सवलतीच्या दरातील भाडे तसेच निवासाची (हॉटेल) व्यवस्था** उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुरस्कार समारंभ **दि. ४ जानेवारी २०२७** रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

सदर पुरस्कारासाठी विद्यार्थ्याची निवड करताना त्याच्या संपूर्ण शैक्षणिक कारकीर्दीचा विचार केला जाईल. सामान्यतः, हा पुरस्कार विद्यापीठातील गुणवत्तेनुसार प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला दिला जाईल. तथापि, एखाद्या विशिष्ट वर्षात असा उमेदवार उपलब्ध नसल्यास, द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला हा पुरस्कार दिला जाऊ शकतो.

जर एखाद्या विशिष्ट वर्षामध्ये कोणताही विद्यार्थी पात्र न आढळल्यास कोणालाही पुरस्कार दिला जाणार नाही. परंतु पुढील वर्षात दोन विद्यार्थी पुरस्कारासाठी पात्र आढळले, तर आधीच्या वर्षी योग्य उमेदवार मिळाला नसल्यास दोघांनाही पुरस्कार दिला जाऊ शकतो.

तरी, आपणास विनंती आहे की, आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील व विद्यापीठ विभागातील सर्व पात्र **दृष्टिहीन विद्यार्थ्यांची** माहिती विद्यापीठामार्फत संकलित करण्यात येत आहे. त्यानुसार सर्व संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांनी आपल्या संस्थेशी संबंधित आवश्यक माहिती खालील Google Form द्वारे दिनांक **२८ ऑक्टोबर २०२६** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत भरणे अनिवार्य आहे.

**Google Form Link :**

https://forms.gle/No3Mem24chsjmPuo7

उपरोक्त बाबत विहित मुदतीपर्यंत माहिती प्राप्त न झाल्यास संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने माहिती सादर केलेली नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे सदर बाब अत्यंत तातडीची समजून आवश्यक माहिती विहित मुदतीत ऑनलाईन सादर करावी, ही विनंती.

कळावे,

(प्रा. डॉ. विनायक जोशी)
संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११ ००७